'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 10, Issue No. - 4 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.625 Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Dec. - 2023

October-November-December- 2023 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol.- 10, Issue- 4

## Multidisciplinary Issue

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Smt. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Swati Lawange, Yeola(Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

*- Chief & Executive Editor*

Swatidhan International Publications
For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Photo Source : From the Article 'Sobha Brahma's Contemporary Paintings : Examining Socio-Cultural and Cognitive Elements' by Aditi Deka

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-



CamScanner

| | | |
|---|---|---|
| 24 | हृदवाहिका रोग के प्रमुख घातक एवं स्वरक के रूप में इंसुलिन प्रतिरोध सिंड्रोम : एक समीक्षात्मक पुनरावलोकन — डॉ. सुभाष दौंदे | 129 |
| 25 | अतिइंसुलिनरक्तता तथा इंसुलिन प्रतिरोध: टाईप २ मधुमेह दुष्चक्र के बुनियादी स्तम्भ — डॉ. सुभाष दौंदे | 139 |
| | **मराठी विभाग** | |
| 26 | लोकसंस्कृतीचे उपासक : गोंधळी आणि वाघ्यामुरळी — प्रा. माधवी पवार | 148 |
| 27 | जैन धर्माच्या दृष्टिकोनातून मोक्ष — प्रा. बाळासाहेब गणपाटील | 154 |
| 28 | बुद्ध तत्वज्ञान आणि समाजकार्य सराव — विकास जाधव | 158 |
| 29 | मराठी साहित्यात महात्मा बसवेश्वर यांचे योगदान — डॉ. अनिल बांगर | 166 |
| 30 | अमृतानुभावातील गुरूमहिमा — डॉ. विनोद भालेराव | 173 |
| 31 | जागतिक, सामाजिक शांतता आणि संत साहित्यातील उपयुक्त अभंग — डॉ. आर.डी.शिंदे | 179 |
| 32 | प्राचीन मराठवाड्यातील राज्य व जनपदे — प्रा. ओंकार डोंगरे | 185 |
| 33 | स्त्री लेखिकांची वाटचाल — डॉ. अंजली मस्करेन्हस | 189 |
| 34 | 'कविता-रती'तील कवितेतील जीवनविषयक जाणिवांचे स्वरूप — डॉ. श्रीकृष्ण पदमणे | 194 |
| 35 | विठ्ठल वाघ व त्यांची वऱ्हाडी कविता — डॉ.कैलास इंगळे, विठ्ठल होनाळे | 201 |
| 36 | खानदेशचे दलित कवी संजीवकुमार सोनवणे यांच्या कवितेतील शैक्षणिक जाणिवेचा अभ्यास — डॉ. दिलीप बिरुटे, ज्ञानसागर सूर्यवंशी | 204 |
| 37 | 'गावगाड्याच्या पडझडीचे संदर्भ' : एक आकलन — डॉ. धनराज धनगर | 209 |
| 38 | भारतातील सामाजिक - धार्मिक सुधारणा चळवळी (१९ व्या शतकाच्या संदर्भात) — डॉ. डी. ई. मनेरे | 214 |
| 39 | मराठी वृत्तपत्रे आणि 'दैनिक लोकसत्ता' — श्रीम. नंदा काळे | 221 |
| 40 | ई-शासन (ई-गव्हर्नन्स) प्रणाली — दिपक नरके | 228 |
| 41 | علامہ اقبال کے کلام کی تشہیر — Dr. Shah Ayaz Ahmed | 234 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher. - Chief & Executive Editor*



CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 10, Issue No. - 4 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.625 Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Dec. - 2023

# मराठी साहित्यात महात्मा बसवेश्वर यांचे योगदान

प्रा.डॉ. अनिल बळीराम बांगर
मराठी विभाग प्रमुख,
को: ए. सो. लक्ष्मी - शालिनी महिला महाविद्यालय-पेझारी,
ता.अलिबाग, जि. रायगड.पिन-४०२१०८
भ्रमणध्वनी: ९०२८०९२१११
anil.bangar580@gmail.com

**प्रास्ताविक:**

मध्ययुगातील भारताच्या धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक,राजकीय आणि सामाजिक जीवनातील जेष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष म्हणून श्री. वीरशैव बसवेश्वरांची ओळख अवघ्या भारत देशाला आहे.बसवेश्वर हे गरिबांचे कैवारी होते. समता हे तत्व त्यांच्या धर्मप्रसाराचे प्रमुख सूत्र होते. आपण जे परिश्रम करतो, कमवतो त्यात ईश्वराचा वाटा आहे. म्हणून त्यातील दीन-दुःखीतांच्या जीवन कल्याणासाठी दानधर्म केला पाहिजे,यावर त्यांनी अधिक भर दिला होता. संत बसवेश्वर एक द्रष्टे,कर्ते सुधारक होते. आपल्या समाज परिवर्तनाच्या विचारांचा प्रसार आणि समाजाच्या कल्याणकारी योजना प्रत्यक्ष राबविण्यासाठी त्यांनी आपले समग्र जीवन समर्पित केले. आपल्या सामाजिक व धार्मिक व्यवस्थेची रचना करताना समाजात अस्तित्वात असणा-या बंडखोर सांस्कृतिक परंपरांचा त्यांनी आधार घेतला. संत बसवेश्वरांनी श्रमप्रतिष्ठा हे सर्व श्रेष्ठ मूल्य मानले. उद्योगातील श्रेणी पध्दतीवर प्रहार केला. मजूर किंवा श्रमिक यांचे जीवन अधिक दृढ,समृद्ध करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले.

वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकामध्ये सामाजिक समतेचा पुरस्कार आपल्या साहित्यातून व्यक्त केला. तथापि त्याहीपूर्वी महात्मा बसवेश्वरांनी समाजाच्या आत्मिक आणि बौध्दिक विकासासाठी आपल्या वचनांमधून सामाजिक नीतिमूल्याचा विचार मांडून वैचारिक क्रांती घडविण्याचा प्रयत्न केला. विशेषतः नारीचा हव्यास, जीवन जगण्यासाठी आवश्यक अर्थार्जन सोडून अधिकचा हव्यास करणे, इतरांना आपल्यापेक्षा दुय्यम लेखणे ही सामाजिक विषमता निर्माण करण्याची लक्षणे आहेत. यापेक्षा दया, क्षमा,शांती, अहिंसा या सारख्या नीतिमूल्यांचा पुरस्कार करून समाज जीवनात सद्विचारांचे बिजारोपन केले तर समाजात समता प्रस्थापित होण्यास एक प्रकारची मदत होईल हा अत्यंत मौल्यवान विचार त्यांनी आपल्या अनेक वचनातून व्यक्त केला आहे.

**जन्म व बालपण :**

महात्मा बसवेश्वरांच्या काळाविषयी मतभिन्नता आहे. बाराव्या शतकाच्या तिसऱ्या दशकानंतर म्हणजे सन ११३१ मध्ये बसवेश्वरांचा जन्म झाला. बसवेश्वर, बसव, बसवन्ना, बसवप्रभू इ. नावाने ते प्रसिद्ध होते. बसवेश्वर हे शैव ब्राह्मण परिवारातील मादिराज आणि मदलांबिका यांचे पुत्र होते. बसवेश्वरांचे जन्मस्थान कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी आजचे (बसवन्न बागेवाडी) मानले जाते. त्यांची पत्नी गंगाम्बिका आणि निलाम्बिका होत्या.



CamScanner

बालपणापासून बसवेश्वर हे श्रेष्ठ क्रांतिकारी विचारांचे होते. मातापित्यांनी त्यांना बालपणी उपनयन संस्कार करून घेण्याचा आग्रह केला. पण लहानवयातच त्यांना या संस्कारातील कर्मकांडाचे पोकळ आणि निकामी उच्चवर्णीय अभिमानाचे स्वरूप जाणवले. ही आंधळी भक्ती व अंधश्रद्धा मोडून काढण्यासाठी त्यांनी संघर्ष केला. प्रत्यक्ष पित्याविरुद्ध आणि रूढी परंपरेविरुद्ध त्यांना बंड पुकारावे लागले. घर सोडून कृष्णा मलाप्रभा नदी संगमावर जाऊन एकचित्ताने संगमनाथाची आराधना करीत तपस्वी जात वेध शिवाचार्यांच्याकडून दीक्षा घेऊन त्यांच्या आश्रयाने ज्ञानसाधना केली. इथेच बसवेश्वरांच्या सत्यकार्याचा विकास झाला आणि कुंडलसंगम येथेच बसवेश्वरांनी आपला जीवनमार्ग निश्चित केला.

**लेखनकार्य :**

बसवेश्वरांच्या 'षट्स्थलवचन' शिखारवचन, कालज्ञानवचन आणि मंत्रगोप्य या ग्रंथांना श्रेष्ठ धर्मग्रंथाचे अमरत्व कन्नडमध्ये प्राप्त झालेले आहे.बसवेश्वरांच्या वचनांचे संकेत नाव 'कुंडलसंगम देवा' असे आहे. बसवेश्वरांच्या जीवनकार्यावर कन्नड, तेलगू, तमीळ, संस्कृत आणि मराठीत अनेक ग्रंथ लिहिले गेले. यांच्याविषयीचे बसवपुराण, बसवराज - विजय, बसवराज - चरित्र, बसवशतक, बसवस्तोत्र, बसव स्तोत्रवचन इत्यादी ग्रंथ पाहावयास मिळतात.

महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला संत परंपरेचा थोर वारसा लाभला आहे.भारतामध्ये समाजसुधारणेच्या कार्यात या संतांचे मोलाचे योगदान आहे.त्या काळच्या जुन्या रूढी-परंपरांमध्ये, बुरसटलेल्या मानसिकतेमध्ये अडकलेल्या समाजाला नवी वैचारिक दिशा देण्याचे काम या संतांनी केले. या संत परंपरेतील एक महान संत म्हणजे महात्मा बसवेश्वर.इ.स. ११३१ ते ११६७ या काळात बसवेश्वरांनी समाज परिवर्तनवादी विचारांची पताका सर्वसामान्य नागरिकांच्या मनात बिंबवण्याचे कार्य केले. महात्मा बसवेश्वर हे कृतिशील क्रांतिकारक होते. त्यांचा सामाजिक समतेवर विश्वास होता. त्यांनी स्त्री-पुरुष भेदभाव, उन्नती,हक्क, जातिभेद, सामुदायिक विवाह, समाजात अस्पृश्यता, प्रत्येकाला विचार स्वातंत्र्य, सर्वांगीण विकास क्षेत्रात उन्नती यांचा अंगीकार केला होता. त्यांचा बालविवाहास विरोध होता आणि विधवांच्या पुनर्विवाहाला त्यांनी मान्यता दिली. देवालयापेक्षा देहालयाचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करणारे संत म्हणून महात्मा बसवेश्वरांकडे पाहिले जाते.

परस्त्रीचा हव्यास झिडकारण्याबाबत संत बसवेश्वरांनी आपल्या वचनातून आग्रही प्रतिपादन केले आहे. कुकर्म करणाऱ्या लोकांना कठोर शब्दांत फटकारले आहे. परस्त्रीचा हव्यास करणाऱ्या व्यक्तीचा कुडल संगमदेव शिरच्छेद करतील. एखाद्या सद्भक्ताने घरी बोलावले तर चोरट्या नजरेने त्या घरातील स्त्रीकडे पाहणे, त्यांचेच अन्न खाऊन वासनांध नजरेने तिच्याकडे पाहणे, कोकराचा पाठलाग करणाऱ्या कुत्र्याप्रमाणे जे क्षणिक आशेच्या मागे लागतात, त्यांना कुडल संगमदेव हजारो वर्षे नरकात पाठविल, अशी संत बसवेश्वर भावना व्यक्त करतात.

"करणी ही शुद्ध हेचि करण । करी तयासी उपदेश तोचि सद्‌गुरु परमेश्वर
ऐशा सद्भक्ताचे निवास मानुनी कैलास । करितो लिंगाअर्चन तो जगत्पावन
ऐशा लोकप्रति विश्वास ठेवुनी । नमो, नमो म्हणे मी, माथा झुकुनी कुडल संगमदेवा"१

संत बसवेश्वरांनी आपल्या वचनांतून कायक संकल्पनेचा उपदेश केला आहे. कायक म्हणजे केवळ पोट भरण्याच्या भौतिक प्रेरणेने अर्थार्जन करणे एवढा मर्यादित अर्थ नाही; तर माणसाच्या नैतिक जीवनाची ती एक



CamScanner

बाजू आहे. तर दासोह ही दुसरी बाजू आहे. एका नाण्याच्या दोन बाजू असाव्यात, अशा प्रकारे कायक आणि दासोह हे दोन घटक असतात. संत बसवेश्वरांनी याचे खूप सुंदर वर्णन केलेले आहे. ते म्हणतात - चांगल्या मार्गाने केलेले अर्थार्जन हे जरी नैतिक असले तरीही अनावश्यक धनसंचय करणे हेही सामाजिक हिताच्या दृष्टीने अनैतिकच आहे. काम, क्रोध, लोभ,मोह, मत्सर, दंभ,यांसारख्या षड्विकारांना मिळालेली ती पुष्टीच आहे म्हणून अतिरिक्त मिळवलेला धनसंचय समाजातील ज्या घटकाला गरजेचा आहे, त्याच्यासाठी उपयोगी आणणे ही खरी नैतिकता आहे. असा विचार अत्यंत चपखलपणे संत बसवेश्वरांनी मांडला आहे.

एका वचनात महात्मा बसवेश्वर म्हणतात- "मंदिराच्या बाहेर पादत्राणे काढून देवाचे दर्शन घेण्यासाठी गाभाऱ्यात गेलेल्या भक्ताचे लक्ष बाहेर सोडलेल्या पादत्राणावरती असते. त्याला परमेश्वरप्राप्ती कधीच होणार नाही."२ संपत्तीवर आराम करण्याच्या प्रवृत्तीची संत बसवेश्वरांनी निर्भत्सना केली आहे. केवळ पूजाअर्चा आणि भक्तीच्या मोठमोठ्या गप्पा मारण्याऐवजी जंगमाला तन, मन, धन अर्पण करून दासोही झाले पाहिजे, यावर संत बसवेश्वरांनी आपल्या वचनातून प्रकाश टाकला आहे. एवढेच नव्हे, तर दासोहसुद्धा स्वतःच्या कष्टाने आणि प्रामाणिकपणे मिळवलेल्या धनसंचयाने करावा. आपल्या संग्रही असलेल्या धनाचा वापर आर्थिकदृष्ट्या गांजलेल्यांसाठी करावा. एवढेच नव्हे, तर समाजातील सामान्य माणसाचा बुद्धिभेद करून त्यांना व्याजाने पैसे देऊन त्यांचे शोषण करणाऱ्या प्रवृत्तीवरही संत बसवेश्वरांनी आसूड ओढला आहे. थोडक्यात, समाजाचा सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक विकास साधावयाचा असेल, तर समाजातील प्रत्येक माणसाने नैतिक मूल्यांचे आचरण काटेकोरपणे केले पाहिजे. तोच सामाजिक शुद्धीकरणाचा राजमार्ग आहे, असे महात्मा बसवेश्वरांना वाटते.

नैतिक मूल्यांची प्रतिष्ठापना हा महात्मा बसवेश्वरांच्या कार्याचा केंद्रबिंदू आहे. उच्च नैतिक मूल्ये समाजात रुजल्याशिवाय सामाजिक विकास आणि समाजाचे शुद्धीकरण होऊ शकणार नाही याची जाणीव संत बसवेश्वरांना होती. व्यक्तीचे स्वकल्याण असो अथवा लोककल्याण असो नीतिमूल्य संवर्धनाशिवाय ते अशक्य आहे. म्हणूनच उच्च नीतिमूल्यांच्या आधारेच समाजातील प्रत्येक माणसाचे अंतरंग आणि बाह्यरंग षड्विकारांचा नायनाट होणार नाही आणि त्याशिवाय परतत्वाचे दर्शन होणार नाही. यासाठी संत बसवेश्वरांनी आपल्या अनेक वचनांतून समाजाला उपदेश केला आहे.

"करू नये चोरी, करू नये हत्या । करू नये क्रोध, बोलू नये मिथ्या
करू नये तिरस्कार, मारू नये बढाई । नको मत्सर ठायी ठायी, हीच बहिरंग शुद्धी.
आमच्या कुडलसंगमदेवास । प्रसन्न करण्याची हीच रीत." ३

अविचारीपणाने होमहवन, व्रतवैकल्य यांसारख्या कर्मकांडाचे आचरण करून चित्तसिद्धी होणार नाही, तर केवळ आणि केवळ नैतिक आचरणानेच माणसाचे चित्त शुद्ध होऊ शकते आणि त्याआधारेच परमेश्वरालाही आपलेसे करण्याचे सामर्थ्य प्राप्त होते. समाजजीवनात वावरताना आपले वर्तन आणि वृत्ती स्वच्छ आणि सुंदर असावी. चोरी आणि हत्या यांसारख्या दुष्ट कृत्यांचा विचारही मनाला स्पर्श करू नये. एवढेच नव्हे तर,

कुणाविषयी तरी क्रोध किंवा क्षणिक लाभासाठी खोटे बोलण्याचा किंवा खोटे आचरण करण्याचा मोह होऊ नये. इतरांचा मत्सर करण्यापासून आपण दूर राहावे. अशा प्रकारचे नैतिकतेला धरून केलेल्या वर्तनामुळेच माणसाचे आंतरबाह्य रूप स्वच्छ आणि सुंदर होऊ शकते. हा अत्यंत मौलिक विचार संत बसवेश्वरांनी आपल्या वचनांतून दिला आहे.

सुंदर आणि सुसंस्कृत मनातच चांगल्या विचारांची पेरणी होऊ शकते आणि तेथेच खऱ्या अर्थाने चांगल्या कर्माची प्रेरणाही मिळते. चांगले मन, चांगले विचार, चांगले आचार आणि चांगल्या अंतःकरणातच परमेश्वर वास करतो. त्यामुळे सत्कर्माची कास धरणाऱ्या प्रत्येक माणसाने दुराचार आणि दुष्ट वृत्ती सोडून विवेकवादाचा स्वीकार केला पाहिजे. अंतःकरणात पावित्र्य नसेल, खरेपणा नसेल तर बाह्यवर्तन कितीही चांगले असून काय उपयोग? म्हणून संत बसवेश्वरांनी आपल्या अनेक वचनांतून चांगली संगती अखंड मिळो, चांगले विचार नेहमी अंतःकरणात रुजोत. त्यातूनच माणसाची अंतःकरण शुद्धी होईल. एका वचनात संत बसवेश्वर म्हणतात

" नेहमी सत्यचि बोलावे । जैसे बोलावे तैसेचि चालावे
असत्यभाषण दुराचारींना । ना आपलेसे करी कुडलसंगमदेव"४

माणसाने नेहमीच सत्य बोलावे, उक्ती आणि कृती यात एकवाक्यता ठेवावी, नेहमीच सत्याच्या बाजूने उभे राहावे. एवढेच नव्हे, तर समाजात जे जे असत्याचा आधार घेतात, दुराचारी वर्तन करतात, त्यांना आमचा कुडलसंगमदेव कधीच आपलेसे करणार नाही. जो देह नश्वर आहे त्या देहासाठी खोटे बोलणाऱ्या, दुराचार करणाऱ्या, पोटभरू प्रवृत्तीला परमात्म्याचे दर्शन कसे घडणार म्हणून एका वचनात संत बसवेश्वर म्हणतात- सत्य बोलणे हाच देवलोक आणि असत्य भाष्य म्हणजे साक्षात मृत्युलोकच.

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या अनेक वचनांतून अहिंसेचा पुरस्कार केला आहे. ते कुडलसंगमदेवाला विनम्रपणे सांगतात, की मीच माझा शत्रू आहे आणि मीच माझा मित्रही आहे.अहिंसेचा पुरस्कार करताना ते म्हणतात –

"हत्या करणाराच अस्पृश्य । कुलाचे प्रयोजन कशासाठी
सकल जीवात्म्याचे हित इच्छिणारे । कुडलसंगमदेवाचे शरणच कुलीन ।"५

हत्या करणारा कोणत्याही धर्माचा, कोणत्याही पंथाचा आणि कितीही श्रेष्ठ असला, तरी तो त्याज्यच असतो. अखिल प्राणिमात्राविषयी माणसाच्या मनात भूतदया निर्माण होणे हेच जीवनाचे उदात्त जीवनमूल्य आहे. म्हणून संत बसवेश्वर म्हणतात- दयेविना धर्म तो कोणता ? सकल प्राणिमात्राविषयी आपल्या मनात दया असावी. कारण दया, क्षमा, शांती हा धर्माचा मूळ गाभा आहे. म्हणून समाजातील प्रत्येक माणसाने आपले आचरण नैतिकतेला धरून केले तर समाजाची वैचारिक उंची वाढण्यास निश्चितच मदत होईल असे वाटते.
'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता:' जेथे नारीची पूजा केली जाते म्हणजेच तिचा सन्मान केला जातो, तेथेच परमेश्वर रममाण होतो ही खरी भारतीय संस्कृती आहे. मात्र, तिची उपेक्षा करणारे, तिला तुच्छ



CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 10, Issue No. - 4 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.625 Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Oct.-Dec. - 2023

लेखणारे, तिचा परोपरीने तिरस्कार करणारे साहित्य आमच्याकडे निर्माण झाले. परिणामी समाजातील स्त्रियांकडे पाहण्याचा निकोप दृष्टिकोन दूषित झाला. हे सामाजिक वास्तव पुरुषप्रधान संस्कृतीत पाहावयास मिळत होते. या पुरुषप्रधान संस्कृतीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर १२व्या शतकात मानवतावादी संत बसवेश्वर आणि त्यांच्या अनुयायांनी स्त्री-पुरुष समानतेची उद्घोषणा केली आणि तिचा सन्मान केला. स्त्रियांकडे दूषित नजरेने पाहणाऱ्या समाजाला -

"कामिनी माया आहे म्हणतात, नाही ती माया नाही
कणक माया आहे म्हणतात, नाही ती माया नाही"६

अशा प्रकारची रचना करून स्त्रियांकडे पूर्वग्रहदूषित दृष्टीने पाहण्याच्या प्रवृत्तीविरुद्ध संत बसवेश्वरांच्या अनुयायांनी मोठा प्रश्न निर्माण केला आहे. स्त्रियांमध्ये असणारी कीर्ती, स्मृती, धृती आणि क्षमा मीच आहे, असे भगवान श्रीकृष्ण गीतेत सांगतात. मात्र, याच स्त्रीला कमल्याही प्रकारचे स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता मनूला वाटली नाही. तथापि, स्त्रियांच्या जीवनाला मुक्त वाट करून दिल्यास सामाजिक स्वास्थ्य निर्माण होण्यास मदत होईल, हे सांगताना ते म्हणतात, "स्त्रियांच्या विचारांना मुक्त वाट दिल्यामुळे त्यांच्या वाङ्मयनिर्मितीस प्रोत्साहन मिळाले. महात्मा बसवेश्वरांनी स्त्रियांना व्यवसाय करण्यास प्रवृत्त केलेच; मात्र त्याबरोबरच त्यांनी विधवांच्या पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले."७ यांसारख्या अनेक प्रकारच्या कृतींमुळे स्त्रियांमधील आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. विशेषतः उच्चवर्णीय स्त्रियांपेक्षा निम्नवर्गीय स्त्रियांमध्ये हा विश्वास निर्माण झाला.

आज २१व्या शतकात स्त्रीमुक्तीसाठी तिच्या सक्षमीकरणासाठी जे प्रयत्न होताना दिसत आहेत, त्याचा प्रारंभ महात्मा बसवेश्वरांनी बाराव्या शतकात केल्याचे दिसून येते. एका बाजूला समाजात स्त्रियांचा गौरव केला पाहिजे, हे सांगतानाच मनुष्य जीवनामध्ये नैतिकता, चारित्र्य यांसारख्या गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. माणसाच्या बाह्यसौंदर्याबरोबरच आंतरिक सौंदर्यही तितकेच महत्त्वाचे आहे. नव्हे, त्यामुळे मानवीजीवनाला नैतिक अधिष्ठान प्राप्त होते, हे सांगताना संत बसवेश्वर म्हणतात-

"कमळामुळे येते पाण्याला शोभा। चारित्र्यामुळे येते स्त्रीला शोभा
चंद्रामुळे येते आकाशाला शोभा। लाटांमुळे येते सागराला शोभा."८

मानवी जीवन आणि निसर्ग यांचे नाते घनिष्ट आहे. जीवन आणि निसर्गातील काही घटना हे मानवी जीवनातील सौंदर्याचे द्योतक ठरतात. अशा घटनांमुळे आणि वस्तूंमुळे वेगवेगळ्या गोष्टींची सुंदरता आणि महत्त्व वाढते. जसे कमळामुळे पाण्याचे, चंद्रामुळे आकाशाचे, लाटांमुळे सागराचे तर चारित्र्यामुळे स्त्रीचे सौंदर्य आणखी वाढत असते, असे संत बसवेश्वर सांगतात.भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांचे वस्त्र, अलंकार, हळदीकुंकू यासारख्या घटकांना अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. सौभाग्यवती स्त्रीने हे सर्व अलंकार परिधान केले असतील आणि ती पतीप्रेमापासून वंचित असेल, तर या अलंकारांना मूल्य राहत नाही. याचा अर्थ या सौभाग्यसंवर्धक गोष्टींतून तिला मिळणाऱ्या आनंदात काही उणेपणा राहतो. तीच गोष्ट संत बसवेश्वर आणि भक्त



CamScanner

यांच्यातील आहे असे ते मानतात. ज्या समाजात स्त्रियांचा सन्मान केला जातो, निर्णयप्रक्रियेत तिला स्थान दिले जाते, तिच्या बौद्धिक आणि शारीरिक सामर्थ्याला महत्त्व दिले जाते, त्या समाजाचा विकास निश्चितपणे ठरलेला असतो. ही भावना संत बसवेश्वरांनी आपल्या वचनातून व्यक्त केली आहे.

**जातीभेदाविरुद्ध परखड विचार :**

भारतीय समाजव्यवस्थेत 'जात' ही प्रभावी संकल्पना आहे. धर्म, वर्ण, वर्ग, वंश, लिंग व जातीच्या नावावर समाजात भेदभाव, विषमता निर्माण होते. महात्मा बसवेश्वरांनी ही सामाजिक विषमता नाकारली. जातीभेदाविरुद्ध परस्पर विचार व्यक्त करून जाती निर्मूलनाचे विचार व कार्य केलेले आहे. महात्मा बसवेश्वर एका वचनात लिहितात-

"महारवाड्याची जमीन अन् मठ मंदिराची जमीन असते का भिन्न ?
ज्ञानीयांची जात अन् अज्ञानीयांची जात असते का भिन्न ? '
'शेठ' कसा म्हणू मी श्रीयाळ शेट्टीस ?'परीट' कसा म्हणू मी मडिवाळ माचयांस ?
'ढोर' कसा म्हणू मी 'ब्राह्मण' अन् मी श्रेष्ठ । नाही का हसणार मजवरी कुडलसंगमेश्वर" ९

मानवी समाजात प्रत्येक जातीसाठी वेगळी व्यवस्था सांगितली आहे. अस्पृश्यता हा समाजाला लागलेला कलंक आहे. त्यामुळे जातीचे अस्तित्व संपल्याशिवाय समता प्रस्थापित होणार नाही. शेवटी एका वचनात महात्मा बसवेश्वर लिहितात.

"जात म्हणजे काय? जात एवढी महत्त्वाची का आहे?
जो सर्व जीवांच्या कल्याणाची काळजी घेतो तोच खरा श्रेष्ठ । तोचि खरा शरण"१०

महात्मा बसवेश्वरांनी आपल्या वचनात जातीभेदावर प्रखर प्रहार केले. जातीअंतासाठी प्रयत्न केले. महात्मा बसवेश्वर हे समग्र सामाजिक समतावादाचे खंदे पुरस्कर्ते होते. विश्वनिर्मितीला कारणीभूत असलेल्या पंचमहाभूतांमध्ये कोणताच भेदभाव नाही; तर मग त्या पंचमहाभूतापासून बनलेल्या मानवी जीवन व समाजव्यवहारात भेदभाव का? असा प्रश्न त्यांनी केला व विषमता भेदभाव हे अनैसर्गिक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

**समारोप:**

बाराव्या शतकात स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुता, सदाचार यांसारखी सर्वश्रेष्ठ जीवनमूल्ये मानवी जीवनामध्ये रुजविण्यासाठी महात्मा बसवेश्वरांनी दिलेले योगदान असामान्य अशा प्रकारचे आहे. भारतीय इतिहासामध्ये कर्नाटकाच्या मातृभूमीवर अशी काही नररत्ने जन्माली आली की त्यांनी जागतिक पातळीवर समतेचा विचार रुजवून अद्वितीय असे कार्य केले आहे.महात्मा बसवेश्वरांचा लिंगायत धर्म प्रामुख्याने दलित संवेदनेवर आणि मानवजातीच्या तत्त्वावर आधारलेला आहे.महात्मा बसवेश्वर पहिले क्रांतिकारी धर्मविचारक होते.महिलांना मुक्तीचे पंख देणारे भारतातील समतेचे जनक म्हणून बसवेश्वरांच्या विचाराकडे पाहता येईल. महात्मा बसवेश्वरांनी अनेक स्त्री वचनकारांना व अलमप्रभू,चन्नबसवेश्वर, सिद्ध रामेश्वर अशा अधिकारी



CamScanner

पुरूषांना एकत्र आणून स्त्री-पुरूष समानतेचा पाया रचण्याचे काम केले. या आणि अशा कार्यामुळे बसवेश्वरांना विश्वगुरु, विश्वभूती, भक्ती भंडारी, क्रांतिकारी, महान,वचनकार, महात्मा अशा पदव्या मिळाल्या.

भारतीय ज्ञानपीठ सन्मानित डॉ. व्ही. के. गोकाक महात्मा बसवेश्वरांविषयी म्हणतात, 'बसवेश्वर हे आजच्या आधुनिक विचारवंतांपेक्षाही अधिक आधुनिक होते.' भारतीय समाजामध्ये समाज प्रबोधन आणि समाज परिवर्तन यांचा रचनात्मक व दिशादर्शक प्रारंभ महात्मा बसवेश्वरांपासून झालेला आहे.बसवेश्वर हे मध्ययुगातील भारताच्या धार्मिक,सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक, राजकीय आणि सामाजिक जीवनातील ज्येष्ठ समाज परिवर्तनवादी युगपुरुष होते. समाजसुधारकांच्या यादीतही यांचे पहिले स्थान आहे. म्हणूनच त्यांना आद्य भारतीय समाजसुधारक, क्रांतियोगी व युगपुरुष मानले जाते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


1. राजा शिरगुप्पे (सं.): सम्यक विद्रोही (बसवण्णा-कबीर-तुकोबा प्रारंभ विशेषांक २००८) पृ. क्र. ३८
2. तत्रैव : तत्रैव पृ.क्र. ३९,
3. तत्रैव : तत्रैव पृ. क्र. ३९
4. तत्रैव : तत्रैव पृ. क्र. ३९,
5. तत्रैव : तत्रैव पृ. क्र. क्र. ४०
6. तत्रैव : तत्रैव पृ. क्र. २९
7. डॉ अशोक मेनकुदळे - क्रांतीकारी युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर, प्रकाशक- महाराष्ट्र बसव परिषद भालकी, संस्करण III २०१४, पृ. क्र. क्र.११८
8. डॉ सूर्यकांत घुगरे - संतसाहित्य आणि बसवेश्वर, वचनचिंतन मुक्तरंग प्रकाशन,पहिली आवृत्ती २०१३, पृ. क्र. ४५.
9. तत्रैव : तत्रैव पृ. क्र. ३५,
10. तत्रैव : तत्रैव पृ. क्र. ३६




CamScanner